**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६४/२०१५-१६/**७०** दिनांक: **३०.०६.२०१६**

**आदेश केस क्र. ६४/२०१५-२०१६**

१) श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख,
सिध्देश्वर टॉवर .३७६, पार्श्वनाथ कॉलनी,
धामणी रोड, सांगली. : अर्जदार.

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, सांगली शहर.

३) अति. कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, माधवनगर.

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. पी.व्ही.खपली, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तक्रारदार श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांनी मंचाकडे न्याय मिळण्यासाठी तक्रार दाखल केली आहे. सबब, केसची सुनावणी दि.२४-०५-२०१६ रोजी घेण्यात आली आहे, सदर सुनावणीस कार्यकारी अभियंता, शहर विभाग सांगली व अतिरिक्त कार्यकारी अभियंता, माधवनगर व स्वतः ग्राहक हे उपस्थित होते.

## (१) तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी .

श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख ग्रा. क्र. २७९९४७४५१०२७ हे सांगली येथील विद्युत ग्राहक आहेत. सिटी सर्व्हे नं ११११, वसंत नगर, बालाजी नगरच्या मागे कुपवाड येथील त्यांच्या प्लॉट मध्ये पोल, ट्रान्सफॉर्मर, तारा व ताण यांचे बेकायदेशिर अतिक्रमण विद्युत वितरण कंपनीने केले आहे व ते अतिक्रमण विद्युत वितरण कंपनीने काढून घेण्याबाबत 'क्ष' फॉर्म मध्ये दि. २९.१२.२०१५ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली.

अध्यक्ष, अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांनी वरील बाबतीत दि. २२.०२.१६ रोजी निर्णय दिलेला आहे. परंतु निर्णयाची प्रत कक्षाकडून त्यांना ६० दिवसांत प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी दि. ०३.०३.१६ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे पोस्टा मार्फत 'अ' फॉर्म मध्ये तक्रार दाखल केली.

सि. सर्व्हे नं. ११११ वसंत नगर, बालाजी नगरच्या मागे कुपवाड येथील त्यांच्या प्लॉट मध्ये वितरण कंपनीने १ L T पोल, १ L T स्टे, व ३ अर्थिंग (वायर) पिट असून प्लॉट समोरील २० फुट जागेवर अंदाजे ३ फुटाचे आंत डी. पी. पोल, ट्रान्सफॉर्मर व लाईन चे काम केलेले आहे. त्यामुळे वरील संपूर्ण डी.पी. पोल व ट्रान्सफॉर्मर इतरत्र हालविण्यात यावे. अशी ग्राहकाची मागणी आहे.

## वि. प. चे निवेदन व चर्चा

वि. प. वितरण कंपनीकडून कार्यकारी अभियंता, सांगली शहर यांनी श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांच्या हद्दीत येणारे लाईनचे पोल, स्टे व रोहीत्राचे अर्थिंग पिट्स हटविण्याचे काम महावितरण कंपनीने दि. २३.०२.२०१६ रोजी केलेले आहे. व रोहीत्र व इतर पोल हे श्री. देशमुख यांचे हद्दी बाहेर असल्यामुळे ते हटविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सद्य परिस्थितीत रोहीत्र व लाईनचे अंतर प्लॉट पासून अंदाजे ३ फुटाचे आसपास आहे. तसेच प्लॉटवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम झालेले नाही. तसेच भविष्यात बांधकाम झाल्यास नगर रचनाकार यांचे नियमानुसार लाईन व बांधकाम मधील अंतर (Horizontal Clearance) हे नियमा प्रमाणेच राहील.

त्यामुळे ग्राहकाला त्यांचे प्लॉट समोरील रोहीत्र व पोल हे इतरत्र हलविण्याचे असल्यास ग्राहकाने वितरण कंपनीकडे अर्ज करावा व नेमके कुठे हलविता येतील या बाबत वितरण कंपनीला जागा दाखवण्यात यावी. व वितरण कंपनीकडे या बाबत शिफ्टींगची तरतुद नसल्यामुळे वरील येणारा खर्च ग्राहकाला नियमानुसार द्यावा लागेल असे सुनावणी दरम्यान कार्यकारी अभियंता, शहर सांगली यांनी नमूद केले.

प्रत्यक्ष चर्चा सादर केलेली कागदपत्रे आणि विनियमातील तरतुद यावरून खालील मुद्दे उपस्थित होतात.

१. तक्रारदार श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांची तक्रार मान्य करता येईल काय?
   उत्तरः- होय, नियमाप्रमाणे.

२. आदेश?
   उत्तरः- अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांचा आदेश मिळण्यापुर्वी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे 'अ' फॉर्म मध्ये तक्रार दाखल केली.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशावरून, सरकारी मोजणी नुसार श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांच्या हद्दी मधील येणारे रोहीत्राचे ३ अर्थिंग, १ L T स्टे, व १ L T पोल हे दि. २३.०२.२०१६ रोजी हद्दी बाहेर हालविण्यात आले आहे. त्यामुळे तक्रारदाराची मागणी अंशतः (ही तक्रार करणेपुर्वी) पुर्ण झाली आहे.

श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांना अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांची दि. २२.०२.२०१६ ची आदेश प्रत पोस्टाने प्राप्त न झालेमुळे त्यांनी मंचाकडे त्याविषयी तक्रार केलेली आहे.

वि. प. महावितरण कंपनीने श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांचे प्लॉटवर चुकीने केलेले अतिक्रमण काढून घेतले आहे. परंतु श्री. देशमुख यांच्या प्लॉट समोरील (हद्दी बाहेरील) असलेले रोहीत्र व L T लाईनचे पोल इतरत्र हलविणे बाबत आक्षेप घेतला आहे. शहर विभागामध्ये जागेच्या अभावी लाईन उभारणीच्या कामामध्ये ब-याच अडचणी येतात त्यामुळे विद्युत वितरण कंपनीला ग्राहकाच्या हद्दीबाहेरील कामामध्ये ग्राहकाला सुचना देण्याची आवश्यकता नसते. अशातच श्री. देशमुख यांचे प्लॉटवर बांधकाम नसलेमुळे व मालकाचा पत्ता प्राप्त न झाल्यामुळे लाईन उभारणीच्या वेळी ग्राहकाला त्यानुसार सुचना करता आली नाही.

वितरण कंपनी मार्फत श्री. बाळासाहेब भाउसाहेब देशमुख यांचे प्लॉट मधील चुकीने उभारलेले L T लाईनचे काम लक्षात आल्यानंतर ताबडतोब हलविलेले आहे.

ग्राहकाला त्यांचे प्लॉट समोर असलेली २० फुट जागेवरील रोहीत्र व L T लाईन पोल इतरत्र हलविण्याची असलेने वितरण कंपनीने ते शिफ्टींगचे काम करुन दयावे या बाबतची तक्रारदाराची मागणी योग्य नाही असे मंचास वाटते.

ग्राहकाला त्यांचे प्लॉट समोर असलेली २० फुट जागेवरील रोहीत्र व लाईन  इतर ठिकाणी हलविण्याची असल्यास वितरण कंपनीच्या नियमानुसार येणारा खर्च करावा व तसेच नेमकी जागा महावितरणच्या सहकार्याने निश्चित करण्यास मदत करावी. त्यानुसार वितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे लाईन व रोहीत्र हलविण्याचे काम करता येईल असे मंचास वाटते.

## आदेश

१. तक्रारदाराची मागणी नियमानुसार मंजूर करण्यात येत आहे.
२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य
एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.